महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN No. U40109MH2005SGC153646 )

मानव संसाधन - रचना व कार्यपध्दती विभाग

फोन नं. (०२२) २६५९५०००
फॅक्स (०२२) २६५९१७२८
E-mail : cgmhr@mahatransco.in
Website : www.mahatransco.in

प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी - १९, ई-ब्लॉक,
७ वा मजला, वांद्रे - कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

क्र.मराविपाकंम/मासं-रवका/मुख्यमंत्री सहायता निधी/ ६३४६ — दि. - २६.०८.२०१९

## परिपत्रक क्र. मासं - ६६

विषय : कोल्हापूर, सांगली, सातारा व कोकण इ. भागात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त जनतेला महापारेषण कंपनीतील अधिकारी/कर्मचा-यांचे माहे - ऑगस्ट २०१९ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत

-------------------

कोल्हापूर, सांगली, सातारा व कोकण इ. भागात अतिवृष्टीमुळे गंभीर पूरस्थिती उद्भवली आहे. नैसर्गिक आपत्तीग्रस्त जनतेला आर्थिक मदत करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. या मदत व पुनर्वसनाच्या कामास आपलाही हातभार लागावा या सामाजिक बांधिलकीतून महापारेषण कंपनीतील अधिकारी/कर्मचा-यांचे माहे - ऑगस्ट २०१९ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे -

१) महापारेषण कंपनीतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या माहे - ऑगस्ट २०१९ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

२) सदर एका दिवसाचे वेतन कपात करताना मूळ वेतन अधिक महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करावे.

३) सदर एक दिवसाच्या वेतन कपातीस ज्या अधिकारी/कर्मचा-यांची हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र संबंधित कार्यालयाच्या मासं-वेतन व देयके विभागाकडे **दि. २८.०८.२०१९** पर्यंत द्यावे.

४) एक दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रकमेपेक्षा कमी रक्कम कपात करण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

५) अशा प्रकारची कपात केलेली कंपनीची एकत्रित रक्कम सांघिक कार्यालयाद्वारे धनादेशाने मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्यात येईल.

३. सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने अंमलात येईल.

४. प्रस्तुत परिपत्रक www.ep.mahatransco.in या कर्मचारी सिंहद्वारावर (Employee Portal) तसेच कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

२६/०८/२०१९

(सुगत गमरे)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)